# प्रेस नोट

## २१वी अखिल भारतीय पोलीस वॉटर स्पोर्टस् स्पर्धा - २०२१ महाराष्ट्र पोलीस दलाची उल्लेखनीय कामगिरी.

## (२ सुवर्ण, १ रौप्य पदक)






| अ.क्र. | क्रीडा प्रकार | खेळाडूचे नाव | कामगिरी |
|---|---|---|---|
| १ | रोईंग कॉक्लेस फोर १००० मीटर | पोशि/संतोष कडाळे | सुवर्ण पदक |
| | | पोशि/राहुल जगझाप | |
| | | पोशि/अनिकेत हळदे | |
| | | पोशि/सुर्यभाल घोलप | |
| २ | रोईंग कॉक्लेस फोर ५०० मीटर | पोशि/संतोष कडाळे | सुवर्ण पदक |
| | | पोशि/राहुल जगझाप | |
| | | पोशि/अनिकेत हळदे | |
| | | पोशि/सुर्यभाल घोलप | |
| ३ | सिंगल स्कल रोईंग ५०० मीटर | पोशि/योगेश लभडे | रौप्य पदक |

२१वी अखिल भारतीय पोलीस वॉटर स्पोर्टस् - २०२१ ही दि. २२ ते २६ नोव्हेंबर २०२१ या कालावधीमध्ये नवी दिल्ली येथे संपन्न झाली. महाराष्ट्र पोलीस वॉटर स्पोर्टस् खेळाडूंनी सहभाग नोंदवून खालील प्रमाणे उल्लेखनीय कामगिरी केली आहे. महाराष्ट्र पोलीस दलाने रोईंग या प्रकारामध्ये कॉक्लेस फोर १००० मी. व ५०० मीटर अशा दोन्ही प्रकारामध्ये **(१.पोशि/सुर्यभाल घोलप २.अभिकेत हळदे ३. पोशि/राहुल जगझाप ४.पोशि/संतोष कडाळे)** उल्लेखनिय कामगिरी नोंदवित सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. प्रतिस्पर्धी हे अतीउच्च खेळाडू असताना सुध्दा आपल्या सरावाच्या कामगिरीराच्या जोरावर महाराष्ट्र रोईंग संघाने इतिहासामध्ये प्रथमच महाराष्ट्र पोलीस दलास सवुर्ण पदकांची कामगिरी

करुन आपले नाव सुवर्ण अक्षरामध्ये नोंद केले. सदर खेळाडूंची निवड ही २३वी ओपन स्प्रिंट नॅशनल चॅम्पीयशिप स्पर्धा - २०२१ स्पर्धेकरीता भारतीय पोलीस संघाकडून करण्यात आली आहे. त्याचबरोबर सिंगल स्कल ५०० मी या प्रकारामध्ये पोशि/ योगेश लभडे यांनी रौप्य पदकाची कमाई केली आहे.

कोरोना - १९ या महामारीच्या मुळे सरावामध्ये खंड पडून सुध्दा आणि कोरोनो नियमांचे काटेकोर पणे पालन करुन आपल्या सरावामध्ये सातत्य राखून सदर खेळाडूंनी अतिशय उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. सरावामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये खंड पडून सुध्दा खेळाडूंनी सरावामध्ये सातत्य राखून पुर्नआगमण केले आहे. प्रशिक्षक/सपोउनि/समाधान गवळी यांनी खेळाडूंकडून उत्कृष्ठ प्रकारे सराव घेवून वेळोवळी त्यांना प्रोत्साहन केले.

महाराष्ट्र पोलीस रोईंग संघास श्री. संजय पांडे, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, श्री. अनुप कुमार सिंग, अपर पोलीस महासंचालक, (प्रशासन) म. रा. मुंबई, सहाय्यक क्रीडा अधिकारी श्री. जुनेद खान, प्रशिक्षक/सपोउनि/ समाधान गवळी यांनी वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देवून मार्गदर्शन केले. त्याचबरोबर त्यांच्यामधील उणिवा दूर करुन खेळातील कार्यक्षमता व मानसिक संतुलन उच्चतम राहिल असे वातावरण तयार केले. अशा केलेल्या प्रयत्नामुळे व मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस दलामधील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत.

**(जुनेद खान)**
सहाय्यक क्रीडा अधिकारी,
महाराष्ट्र राज्य पोलीस, मुंबई.